# ३ लघुउद्योग व व्यवसाय


३.१ प्रस्तावना

३.१.१ अर्थ

३.१.२ व्याख्या

३.२ लघुउद्योगाचे महत्त्व

३.३ लघुउद्योगाचे फायदे

३.४ लघुउद्योगासमोरील आव्हाने.

३.५ लघुउद्योगाच्या उभारणीचे टप्पे

- स्वाध्याय
- सारांश


अरुण आणि अनिल हे चांगले मित्र आहेत. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर उद्योजकता विषयाचा किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला. नोकरी मिळविणे कठीण आहे हे लक्षात आल्यानंतर, आपण पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमामधील कौशल्याचा वापर करून स्वतःचा एक लहानसा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना त्यांच्या मनात आली. अर्थातच, व्यवसायाविषयी त्यांना अल्पच माहिती होती. कोणता व्यवसाय सुरू करायचा? व्यवसायासाठी लागणारी यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीची गरज कशी पूर्ण करावयाची? भांडवल कसे उभे करावयाचे? व बाजारपेठ कशी निर्माण करावयाची याविषयी ते चिंताग्रस्त होते.

जिल्हा उद्योग केंद्राकडून दिलेले एक जाहीर प्रकटन त्यांच्या पाहण्यात आले. हे प्रकटन पुणे जिल्हा उद्योग केंद्र, औद्योगिक वसाहत, पुणे यांच्याकडून देण्यात आले. यामध्ये तरुण उद्योजकांच्यासाठी सरकारकडून देण्यात येणाऱ्या साहाय्या विषयी परिसंवाद आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. ही बातमी ऐकून उत्साहित झालेल्या या दोन मित्रांनी त्या परिसंवादास उपस्थित राहण्याचे ठरविले.

ग्रामीण रोजगार निर्माण कार्यक्रमाअंतर्गत सुशिक्षित तरुणांना आर्थिक व इतर मदत केंद्र व राज्य सरकार पुरविणार असल्याचे त्यांना सांगण्यात आले. आमरस व कोकम ज्यूस याला भरपूर मागणी असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांचे उत्पादन करण्याचे त्यांनी ठरविले. खादी व ग्रामीण उद्योग संघाकडून आर्थिक मदत घेऊन त्यांनी आपल्या खेडेगावामध्ये लघुउद्योग सुरू केला.

सध्या ते मँगो ज्यूस व कोकम ज्यूसचे यशस्वी उत्पादक असून नजिकच्या भविष्यामध्ये त्यांची निर्यात करण्याचा प्रकल्प उभा करण्याचा मानस आहे.

## ३.१ प्रस्तावना :

वाढती लोकसंख्या ही मनुष्यबळ विकासाची संधी मानली जाते. बेकारीची समस्या हा ज्वलंत प्रश्न आहे. भारताने स्वातंत्र्योतर काळामध्ये लघुउद्योगाच्या विकासावर विशेष लक्ष दिले आहे. तरीही, नवीन औद्योगिक धोरणाने सुध्दा बेकारीच्या समस्येवर मात करता आलेली नाही. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी उद्योग, लघुउद्योग व कुटीर उद्योगांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतासारख्या विकसनशील देशाचा विचार करता, लघुउद्योगाच्या विकासासाठी भांडवल व इतर संसाधनात वाढ केली पाहीजे. ही वस्तुस्थिती आहे की, भारतामध्ये अकुशल व मध्यम कुशल कारागीर, लघुउद्योगासाठी सहज उपलब्ध आहेत. लघुउद्योगामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करता येतो.

ग्रामीण भागातसुद्धा या उद्योगामार्फत मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ शकतो. देशाच्या विकासासाठी लघुउद्योग महत्त्वाची भूमिका पार पाडतात. ज्याठिकाणी अल्प भांडवल व कमी मनुष्यबळ लागते त्याठिकाणी हा व्यवसाय प्रकार उपयुक्त असतो.

### ३.१.१ अर्थ :

भारतामध्ये जे उद्योग अल्प प्रमाणावर वस्तूचे उत्पादन करतात, यंत्रसामग्रीची मदत घेतात, कामगारांची नेमणूक करतात व विजेचाही वापर करतात, अशा उद्योगांना लघुउद्योग असे संबोधले जाते.

सध्या लघुउद्योगाच्या व्याख्येत बदल झाला आहे. याबाबतची व्याख्या दोन गट प्रकारात सांगता येईल.

अ) विजेचा वापर परंतु, ५० पेक्षा कमी कर्मचारी

ब) विजेचा वापर न करता ५० पेक्षा जास्त परंतु १०० पेक्षा कमी कर्मचारी.

अर्थातच, यंत्रसामग्री, इमारत इ. मधील भांडवली गुंतवणूक हा लघु, मध्यम व मोठ्या उद्योगातील प्राथमिक स्वरूपातील फरक दर्शवितो.

अद्यावत व्याख्येनुसार सरकारने भांडवल गुंतवणुकीची जी सीमा निश्चित केली आहे त्यानुसारच लघुउद्योगाचे वर्गीकरण केले जाते.

### ३.१.२ व्याख्या :

- खालील अटींची पूर्तता करणाऱ्या औद्योगिक घटकाला लघुउद्योग असे म्हणतात.

यंत्रे आणि उपकरणे यासारख्या स्थिर मालमत्तेमधील स्वतः मालकाने केलेली, भाडेपट्टीने घेतलेली किंवा भाडे कराराने केलेली गुंतवणूक रुपये एक कोटी पेक्षा जास्त असू नये. अर्थातच, हा उद्योग व्यवसाय दुसऱ्या कोणत्याही उद्योग घटकांकडून नियंत्रित केला जाऊ नये किंवा त्यावर त्यांचा मालकी हक्क असू नये.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ नुसार (MSMED ACT - 2006 - Micro, Small & Medium Enterprises Development Act - 2006)

व्यवसाय दोन प्रकारात विभागले जातात.

१) उत्पादक क्षेत्र  २) सेवा क्षेत्र.

MSMED कायद्यानुसार गुंतवणुकीचे निकष

| व्यवसाय | उत्पादन क्षेत्र | सेवा क्षेत्र |
|---|---|---|
| सूक्ष्म | ₹. २५ लाखांपेक्षा जास्त नाही | ₹. १० लाखांपेक्षा जास्त नाही |
| लघु | ₹.२५ लाखांपेक्षा जास्त पण ₹.५ कोटीपेक्षा जास्त नाही | ₹.१० लाखांपेक्षा जास्त पण ₹.२ कोटीपेक्षा जास्त नाही |
| मध्यम | ₹.५ कोटीपेक्षा जास्त पण ₹.१० कोटीपेक्षा जास्त नाही | ₹.२ कोटीपेक्षा जास्त पण ₹.५ कोटीपेक्षा जास्त नाही |

**लघु उद्योग क्षेत्र**

**अ) पारंपारिक लघुउद्योग**

१) हातमाग

२) हस्तकौशल्य

३) काथ्यापासून वस्तू बनविणारे उद्योग

४) रेशीम उद्योग

५) खादी व ग्रामीण उद्योग

**ब) आधुनिक लघुउद्योग**

१) सायकलचे भाग

२) शिलाई यंत्र

३) ब्लेडस्, रेझर्स

४) इलेक्ट्रीक वस्तू

५) सुटे भाग

**३.२ लघुउद्योगाचे महत्त्व :** अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये लघुउद्योगाची भूमिका महत्वाची असते. कृषी आणि कृषी-पूरक उद्योगांना ते संजीवनी देतात.

**१) रोजगाराची संधी –**

रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबाबत लघुउद्योग हा द्वितीय स्थानावर आहे. कारण हा व्यवसाय अल्प भांडवलावर चालतो. लघुउद्योग हा मुलभूत व उपयुक्त कौशल्यावर चालतो. त्यामुळे भारतासारख्या श्रमप्रधान देशाला ते एक वरदान आहे.

**२) प्रादेशिक समतोल –**

भारतामध्ये सर्वच विभागांमध्ये समान विकास झालेला नाही. औद्योगिकरणांमुळे कांही विभाग खूपच विकसित झाले असून कांही विभाग मात्र उद्योग धंद्यांअभावी अविकसित राहिले आहेत. अल्प भांडवलावर लघुउद्योगांची उभारणी केली जाते. लघुउद्योग हे सामान्य तंत्रज्ञान, स्थानिक उपलब्ध संसाधने आणि श्रम यांचा वापर करून वस्तूंची निर्मिती करतात. त्यामुळे देशाच्या समतोल विकासामध्ये ते महत्त्वाचे योगदान देतात.

**३) स्पर्धाशक्ती वाढते :**

कमी उत्पादन खर्चाचे अनेक फायदे लघुउद्योगांना मिळतात. हे उद्योग कमी खर्चिक अशा स्थानिक उपलब्ध संसाधनाचा वापर करतात. लघुउद्योगांची स्थापना करण्याचा व चालविण्याचा खर्च तुलनेने फार कमी असतो. कमी उत्पादन खर्च, इतर कमी खर्च यामुळे वस्तूंची किंमत कमी राहते. उलाढालीत वाढ होऊन स्पर्धाशक्तीत वाढ होते.

**४) नैसर्गिक संसाधनाचा वापर :**

लघुउद्योग हे श्रम-प्रधान असतात. स्थानिक भागातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा व कच्च्या मालाचा ते वापर करतात. या नैसर्गिक संसाधनाच्या वापरामुळे उत्पादन खर्च कमी होतो. त्यांचाच परिणाम म्हणजे स्थानिक उत्पादनाची किंमत वाजवी राहते.

**५) स्थलांतरात घट :**

लघुउद्योग हे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध करतात. लघुउद्योग हा स्वरोजगाराचा आदर्श नमुना आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतरात घट होते किंवा ते कमी होते.

**६) मोठ्या उद्योगासाठी पूरक :**

जास्तीत जास्त मोठे उद्योग हे लघुउद्योगावर अवलंबून असतात. अनेक लघुउद्योग, मोठ्या उद्योगांना कच्चा माल, अर्ध पक्का मालांचा पुरवठा करतात. उदा. यंत्राचे सुटे भाग.

### ७) नव उद्योजकांचा विकास –

नवीन, तरुण आणि होतकरू उद्योजकांना आकर्षित करण्याची क्षमता लघुउद्योगांकडे असते. तांत्रिक आणि अतांत्रिक कौशल्य क्षमता असणारे उद्योजक या व्यवसायाकडे आकर्षित होतात. तसेच, लहान-लहान प्रमाणावरील व्यवसाय करणे मोठ्या उद्योजकांना शक्य नसते.

भारत हा खेड्यांचा देश आहे. त्यामुळे सरकारने लघु आणि कुटीर उद्योगांच्या विकासावर भर दिला पाहिजे. असे झाले तर देशात समप्रमाणात आर्थिक विकास होण्यास मदत होईल.



- **कृती**

तुमच्या भागात उपलब्ध असणाऱ्या कच्च्या मालावर आधारित असणाऱ्या लघुउद्योगांची माहिती घ्या, अशा लघुउद्योगांवर अवलंबून इतर कोणते उद्योग व व्यवसाय सुरू केले आहेत?

## ३.३ लघुउद्योगाचे फायदे :

देशाच्या आर्थिक विकासामध्ये लघुउद्योगांनी नेहमीच महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. लघुउद्योगाचे फायदे पुढील प्रमाणे –

### १. मोठ्या प्रमाणावर रोजगार :

भारतामध्ये श्रमिकांची विपुलता आहे. मोठ्या प्रमाणावर रोजगारांच्या संधी निर्माण करण्याची क्षमता लघुउद्योगांमध्ये आहे. इतर उत्पादनाच्या घटकापेक्षा 'श्रम' या घटकाचा ते अधिक वापर करतात. लघुउद्योगांचा स्थापना कालावधी कमी असतो आणि लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात.

### २. अल्प भांडवलावर व्यवसाय :

मोठ्या उद्योगांच्या तुलनेत लघुउद्योगांसाठी फारच कमी भांडवल लागते. उद्योजक मर्यादित भांडवलाच्या साहाय्याने लघुउद्योग सुरू करतात.

### ३. स्थानिक संसाधनाचा विनियोग :

स्थानिक ठिकाणी जी संसाधने उपलब्ध आहेत त्याचा उपयोग उत्पादनासाठी लघुउद्योग करतात. तसेच अल्प प्रमाणावरील बचती ज्या निव्वळ पडून आहेत, त्या सुद्धा वापरात आणता येतात. त्यामुळे भांडवलात वाढ होऊन अर्थव्यवस्थेच्या गुंतवणुकीत वाढ होते.

### ४. औद्योगिक उत्पादनात वाढ :

लघुउद्योग गृहपयोगी वस्तूंबरोबरच औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक घटकांचे उत्पादन करतात. वस्तूंच्या किंमती या कमी असून गरीब वर्गातील लोकांच्या गरजा भागविणाऱ्या असतात. देशाच्या औद्योगिक उत्पादनातील महत्त्वाचा हिस्सा लघु उद्योग उत्पादित करतात.

### ५. निर्यातीमधील योगदान :

औद्योगिक निर्यातीमधील जवळजवळ ४०% वाटा हा लघुउद्योगाच्या उत्पादनाचा आहे. उदा. पायमोजे, लहान मुलांचे कपडे, रत्ने आणि दागदागिने, हस्तकौशल्याच्या वस्तू, काथ्या पासून बनविलेल्या वस्तू, लोकरीचे तयार कपडे, प्रक्रिया केलेले खाद्य पदार्थ, रासायनिक व रसायने अशासारखे उद्योग, मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक माल यांचा भारतीय निर्यातीमध्ये मोठा वाटा असतो. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या व निर्यात करणाऱ्या उद्योगांनासुद्धा लघुउद्योगांतील माल पूरक ठरतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निर्यातीमध्ये त्यांचा वाटा महत्त्वपूर्ण असून बहुमूल्य असे परकीय चलन प्राप्त करतात.

### ६. न्याय्य वाटप :

मोठ्या उद्योगांमुळे उत्पन्नाचे असमतोल वाटप व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होते. परंतु, लघु उद्योग संसाधनाचे व संपत्तीचे जास्तीत जास्त न्याय्य वाटप करतात. हे उद्योग श्रमप्रधान असल्यामुळे जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांच्यामध्ये उत्पन्नाची विभागणी केली जाते. यातून आर्थिक व सामाजिक कल्याण साधले जाते.

### ७. विदेशी चलनाची मिळकत :

जगातील विविध देशामध्ये वस्तूंची निर्यात करून बहुमूल्य असे परकीय चलन लघुउद्योगामुळे मिळते. त्याचवेळी त्यांची आयात कमी केल्याने देशातील चलन कमी प्रमाणात बाहेर जाते. लघुउद्योगाच्या स्थापनेसाठी यंत्रा व तंत्रामधील गुंतवणुक मोठ्या उद्योगाच्या तुलनेने कमी असते. त्यामुळेच लघुउद्योजक मोठ्या प्रमाणावर विदेशी चलन देशात मिळवून देतात. उदा. तिरुपुर (Tirupur) मधील लघुउद्योग आपल्या देशाच्या कापड निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात व देशाला महत्त्वपूर्ण असे परकिय चलन मिळवून देतात.

### ८. उद्योजकतेतील संधी :

अल्प भांडवलावर लघुउद्योग सुरू करण्याची संधी उद्योजकांना मिळते. मोठ्या उद्योगांशी तुलना करता लघु उद्योगाच्या स्थापनेसाठी भांडवल आणि यंत्रातील आणि तंत्रज्ञानातील गुंतवणूक कमी लागते. त्यामुळे लघुउद्योजक लघु व्यवसाय अगदी सहज सुरू करू शकतात व यशस्वी होऊ शकतात. असंख्य लघुउद्योगाच्या देशाच्या विकासातील योगदानामुळे दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेल्या जपानने एक आर्थिक महासत्ता म्हणून गौरव प्राप्त केला आहे.

### ९. खर्चात बचत :

लघुउद्योग सूक्ष्म उत्पादन पद्धतींचा वापर करतात. त्यामुळे चांगल्या दर्जाच्या व विविध प्रकारच्या वस्तू कमी खर्चामध्ये उत्पादीत करता येतात. कमी उत्पादन खर्चामुळे लघुउद्योग मोठ्या उद्योगाच्या तुलनेत खर्चात बचत करणारे असतात.

### १०. स्थलांतर घट :

ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना जेंव्हा रोजगार मिळत नाही आणि रोजगाराच्या शोधात जेव्हा ते शहराकडे येतात तेंव्हा त्याला स्थलांतर असे म्हणतात. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या स्थलांतरमुळे शहरातील जमीन, पाणी आणि इतर संसाधनावर भार पडतो. परिणामी राहणीमानाचा दर्जा घसरतो. परंतु, लघुउद्योगामुळे शिल्पकार, कारागिर इ. च्या कौशल्याचा व ज्ञानाचा उपयोग केला जातो. लघुउद्योगामुळे वंशपरंपरेने कौशल्य प्राप्त असणाऱ्यांना फायदेशीर रोजगार उपलब्ध करून दिला जातो की ज्यामुळे आर्थिक विकास होण्यास मदत होते. अशाप्रकारे लघुउद्योग स्थलांतर कमी करण्यास मदत करतात.

### ११. कामातील लवचिकता :

हे जास्त लवचीक असतात. बाजारपेठेतील बदलत्या गरजेनुसार (बदलानुसार) हे उद्योग स्वतःला चटकन सावरून घेतात. नवीन संधीचा फायदा घेण्यासाठी सज्ज असतात.



- **कृती**

तुमच्या भागातील लघुउद्योगांना भेट द्या. मालकांशी व कामगारांशी संवाद साधा व चर्चा करा. तुमच्या निरिक्षणावर आधारित सविस्तर अहवाल तयार करा. त्यामध्ये पुढील मुद्दयांचा समावेश असावा. जडणघडण व स्वरूप, विशेष उत्पादन, व्यवसायाचे वार्षिक व भांडवली खर्च, विक्री पद्धत, त्या विशिष्ट उद्योगाच्या समस्या.

- **कृती**



जवळच्या २ ते ३ उद्योगांना भेटी द्या आणि तिथल्या पायाभूत सुविधांच्या स्थितीचे निरीक्षण करा. त्या उद्योगांच्या पायाभूत सुविधांची तुलना करा आणि उत्पादकता व उद्योजकांच्या सुविधा यामध्ये काही संबंध आहे का ते शोधून काढा.

## ३.४ लघु उद्योगासमोरील आव्हाने :

भारतामध्ये लघुउद्योगांना अनेक अडचणी व समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणून त्याचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या कार्यावर होतो. लघुउद्योगासमोर खालील समस्या आहेत.

### १) उत्पादनाच्या जुन्या पद्धती :

सर्वसाधारणपणे लघुउद्योग उत्पादनासाठी कालबाह्य तंत्रे व जुनाट उत्पादन पद्धतींचा वापर करतात. कमी दर्जाचे तांत्रिक ज्ञान व कौशल्यांच्या वापरामुळे अनेक उद्योगांची उत्पादकता कमी होते.

### २) भांडवलाची कमतरता :

पुरेसे भांडवल उपलब्ध न होणे ही लघु उद्योगाची महत्त्वाची समस्या मानली जाते. साधारणतः लघु उद्योग हे अल्प भांडवलावर सुरू केले जातात. लघु क्षेत्रातील अनेक उद्योग भांडवल बाजारमधून निधी उभा करतात. या उद्योगांना वारंवार खेळत्या भांडवलाची कमतरता भासते.

### ३) कच्च्या मालाची समस्या :

कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा ही लघुउद्योगासमोरील आणखी एक महत्त्वाची समस्या आहे. यामुळेच लघुउद्योगांना कच्च्या मालाच्या दर्जाबाबत तडजोड करावी लागते किंवा दर्जेदार मालासाठी अधिक किंमत मोजावी लागते.

### ४) कामगार समस्या :

बहुतांशी बऱ्याच लघुउद्योगांकडून अल्प मजुरीवर अकुशल व मध्यम कुशल कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. त्यामुळे कामगारांची कमी कार्यक्षमता, गैरहजेरीचे प्रमाण अधिक, कामाची संतुष्टता कमी या सारख्या समस्या निर्माण होतात. व्यवसायाच्या आर्थिक मर्यादेमुळे मजुरीचे प्रमाण कमी राहते. परिणामी कर्मचारी असंतुष्ट होऊन गैरहजर राहतात किंवा काम सोडून जातात. थोडक्यात, कामाच्या ठिकाणी परीस्थिती, अल्प मजुरी, योग्य नियम व कायद्याची कमतरता, मालकांची लहरी निर्णय प्रक्रिया, अयोग्य वेळा, नोकरीच्या शाश्वतीची हमी नसणे इ. कारणांमुळे तज्ज्ञ, हुशार कामगार या लघुउद्योगांकडे आकर्षित होत नाहीत.

### ५) विपणन विषयक समस्या :

उत्पन्न मिळविण्याचे साधन असल्याने विपणन हे महत्त्वाचे मानले जाते. वस्तुंच्या प्रभावी विपणनासाठी ग्राहकांच्या गरजा व आवश्यकतांची पुरेपूर माहिती असली पाहिजे. बहुतांशी लघुउद्योग हे विपणनाबाबत कमकुवत असतात. म्हणून बरेच लघु उद्योग व्यवसायिक मध्यस्थांवर अवलंबून असतात. ज्यांच्याकडून कमी किंमत, उशिरा पैसे देऊन पिळवणूक केली जाते. पायाभूत सुविधांच्या अभावामुळे लघुव्यावसायिकांना प्रत्यक्ष विपणन अशक्यप्राय असते.

### ६) वाहतुक समस्या :

लघुउद्योगांना वाहतुकीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांना वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. उदा. कारखान्यापर्यंत कच्च्या मालाची वाहतुक करणे, कारखान्यापासून बाजारापर्यंत पक्का माल वाहून नेणे,

वाहतुकीच्या साधनांच्या कमतरतेमुळे कच्चा माल बाजारातून कारखान्यापर्यंत पोहचविणे आणि उत्पादित माल बाजारापर्यंत पोहचविणे कष्टप्रद ठरते.

### ७) आजारी उद्योग :

लघुउद्योगांचे आजारपण ही धोरणकर्ते व उद्योजक या दोघांच्याही दृष्टीने चिंतेची बाब आहे. अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही कारणांचा या उद्योगाच्या आजारपणात समावेश होतो. अंतर्गत समस्येमध्ये अकुशल कामगार, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव, व्यवस्थापकीय व विपणन कौशल्यांचा अभाव यांचा समावेश होतो. बाह्य समस्येमध्ये उशिरा होणारी वसुली, खेळत्या भांडवलाची कमतरता, अपुरा कर्जपुरवठा आणि उत्पादनास योग्य मागणीचा अभाव यांचा समावेश होतो.

### ८) इंधनाची कमतरता व अपुरा पुरवठा :

जादा दराने होणारा वीज पुरवठा, वीज कपात, वारंवार होणारा खंडित विद्युत पुरवठा, अनियमित वीज पुरवठा, कमी-अधिक दाबाने वीज पुरवठा, वाढते वीजेचे दर यामुळे उत्पादकतेवर विपरित परिणाम होतो. परिणामी, लघु व्यवसायांच्या कार्यपध्दतीवर व नियमित उत्पादनावर परिणाम होतो.

### ९) वैश्विक स्पर्धा :

लघुउद्योगांच्या वर नमुद केलेल्या समस्येबरोबरच, विविध देशांनी अंगिकारलेल्या (स्वीकारलेल्या) उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यातून निर्माण झालेल्या समस्यांना सामोरे जावे लागते. वरील धोरण जगातील अनेक देशांनी स्वीकारले आहे.

## ३.५ लघुउद्योगांच्या उभारणीचे टप्पे :

मोठ्या उद्योगांच्या तुलनेने लघुउद्योग अधिकाधिक स्वातंत्र्य देतात आणि ज्यांना उद्योजक बनायचे आहे, त्यांचे स्वप्न पूर्ण करतात (मोठ्या व्यवसायासाठी/उद्योगासाठी विस्तृत नियोजनाची गरज असते). खाली दिलेल्या सामान्य टप्प्यांच्या आधारे कोणीही सहज लघुउद्योग सुरू करू शकतो.

### १) उद्योग किंवा व्यवसायाची निवड :

जो लघुउद्योग सुरू करावयाचा आहे प्रथम त्याचा आराखडा तयार करावा लागतो. त्यासाठी तुम्हाला प्रमंडळ, व्यक्तीगत व्यवसाय किंवा भागीदारीपैकी कोणता व्यवसाय सुरू करावयाचा आहे त्याचा निर्णय घ्यावा लागतो. संभाव्य उद्योजक, उद्योजकीय कारकीर्द सुरू करण्याअगोदर आपली बलस्थाने, कमजोरी (दुर्बलता) यांचे विश्लेषण करतो. या विश्लेषणाचा उपयोग व्यवसायाचा आकार व प्रकार निश्चित करण्यासाठी होतो.

### २) व्यावसायिक पर्यावरणाची पाहणी :

उद्योग सुरू करण्याअगोदर व्यावसायिक पर्यावरणाचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. व्यावसायिक पर्यावरणामध्ये औद्योगिक धोरण, आर्थिक धोरण, परवाना धोरण, कायदेशीर पर्यावरण व तांत्रिक पर्यावरण यांचा अभ्यास आवश्यक आहे. उद्योगाच्या स्थापनेवर पर्यावरणाचा फार मोठा प्रभाव पडतो.

### ३) उत्पादनाची निवड :

उद्योजकाला कोणत्या वस्तूचे उत्पादन करावयाचे आहे किंवा कोणती सेवा प्रदान करावयाची आहे हे प्रथम निश्चित करावे लागते. तयार करण्यात येणारे उत्पादन किंवा पुरविण्यात येणारी सेवा देण्यापूर्वी बाजारपेठेचे संशोधन करून स्पर्धकांविषयी माहिती घेणे आवश्यक आहे.

### ४) जागेची निवड :

लघुउद्योग सुरू करण्यापूर्वी उद्योगाच्या/व्यवसायाच्या जागेची निवड केली पाहिजे. अशा जागेची निवड करताना बाजारपेठेची उपलब्धता, कच्च्या मालाची उपलब्धता, वाहतुकीच्या सुविधा, आधुनिक पायाभूत सोईसुविधा आणि संबधित इतर घटकांचा विचार केला पाहिजे. व्यवसायाचे यश किंवा अपयश हे व्यवसायाच्या स्थान निश्चितीवरच अवलंबून असते.

### ५) तंत्रज्ञानाची निवड :

उत्पादनासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यासाठी उद्योजकाने उपलब्ध तंत्राची माहीती घेऊन सर्वोत्कृष्ट तंत्राची निवड केली पाहिजे.

### ६) प्रकल्प तयार करणे :

प्रकल्पाची किंमत ठरविणे म्हणजेच प्रकल्पाचे मुल्यमापन करणे होय. प्रकल्प तयार करणे हे एक कौशल्य आहे. प्रकल्प तयार केल्यानंतर व्यवसायाची उभारणी करणे सोपे जाते. उद्योजकाला आर्थिक, तांत्रिक, बाजारपेठ, सामाजिक आणि व्यवस्थापकीय दृष्ट्या प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे.

### ७) अर्थपुरवठा :

व्यवसायाची रक्तवाहिनी म्हणजेच अर्थपुरवठा होय. त्यामुळे भांडवलाची व्यवस्था करणे सर्वात महत्त्वाची पायरी आहे. शून्य भांडवलावर कोणताही व्यवसाय उभा राहू शकत नाही. आपल्याकडे पुरेशी आर्थिक तरतूद नसेल तर उसनवार पैसे घेणे किंवा कर्ज उभारणे हाच सर्वोत्तम पर्याय आहे.

### ८) नोंदणी :

सरकारकडे उद्योगाची नोंदणी वेळेत करणे नेहमीच फायद्याचे असते. उद्योजकाने अधिकृत नमुन्यातील अर्ज जिल्हा उद्योग केंद्राकडे किंवा उद्योगीय संचालकाकडून प्राप्त केला पाहिजे. व्यवस्थितपणे भरलेला अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह जिल्हा उद्योग केंद्राकडे किंवा उद्योगीय संचालकाकडे जमा करणे आवश्यक आहे.

### ९) संसाधने व्यवस्था :

लघुउद्योगाची नोंदणी झाल्यानंतर प्रत्यक्ष उत्पादन ही पुढील पायरी आहे.

#### अ) भौतिक संसाधने :

भौतिक संसाधनांमध्ये जागा वाटप आणि उत्पादक पद्धतीचा समावेश होतो. विविध विभागांसाठी आवश्यक यंत्रसाम्रगी खरेदी आणि कामगारांची भरती देखील आवश्यक बाब आहे.

#### ब) वीज आणि पाणीपुरवठा व्यवस्था :

ज्या जागेवर व्यवसायाची उभारणी केली जाते तेथे विजेची योग्य ती व्यवस्था करावी. उद्योजकाने आवश्यक त्या एकूण वीजेचा अंदाज करावा. जवळच्या वीजेच्या खांबावरून वीज पुरवठा होईल अशी व्यवस्था करावी. जेणेकरून वीज जोडणी खर्च कमी राहील.

#### क) कर्मचारी भरती :

यंत्रे बसविल्यानंतर ती चालविण्यासाठी मनुष्यबळाची गरज निर्माण होते. त्यानंतर कोणत्या कामासाठी कोणत्या प्रकारच्या कर्मचाऱ्याची गरज आहे हे ठरवावे. कर्मचाऱ्याची उपलब्धता असण्याचे मार्गही महत्त्वाचे आहेत. त्यानंतर भरती, प्रशिक्षण व निवड पद्धतीचा वापर करावा.

### १०) उत्पादन आणि विपणन :

उद्योजकीय विकासाचा विचार केल्यास विपणन हे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. विपणन व जाहिरात या लघुउद्योगाच्या उभारणीतील फार महत्त्वाच्या पायऱ्या आहेत. जाहिरातीसाठी आधुनिक, तांत्रिक प्रणाली व पारंपारिक मार्गाचा उपयोग करावा. जाहिरातीमुळे उत्पादनाला बाजारपेठ मिळते.

### ११) पाठपुरावा :

व्यवसाय नितीप्रमाणे उत्पादन, दर्जा, नफा प्रदानता इ. संदर्भात नियमित नियंत्रण आणि मूल्यमापन फायदेशीर ठरते. याबरोबरच व्यवसायाच्या भविष्यकालीन विकासाची दिशा ठरविणे सोपे जाते.

सारांश रूपाने, लघुउद्योगाची स्थापना करणे कठीण नसून मोठ्या उद्योगांच्या तुलनेने सुलभ आहे. लघुउद्योग राष्ट्राच्या आर्थिक विकासात मदत करतात.

- **कृती**



जिथे कृषी आधारित उत्पादन विकले जाते त्या स्थानिक बाजारात जा. कांही उत्पादनांची यादी तयार करा आणि पुढील मुद्दयाच्या आधारे विक्रेत्याला काही प्रश्न विचारा व चर्चा करा.

अ) त्यांनी या वस्तू कोठून खरेदी केल्या? (घरी तयार करण्यात आले किंवा नाही)

ब) कच्चा माल व वाहतुकीची समस्या कोणत्या आहेत?

क) सध्याच्या नफ्याच्या प्रमाणाबद्दल ते समाधानी आहेत का?

ड) सरकारकडून व स्थानिक बाजारपेठेकडून कोणत्या अपेक्षा आहेत?

- **कृती**



तुमच्या गावातील व्यवसायाच्या सभोवतालच्या परिस्थितीची माहिती द्या व चर्चा करा.

तेथे कोणता उद्योग सुरू करणे चांगले ठरू शकते? या प्रकरणात अभ्यास केलेल्या मुद्दयानुसार, तपशीलवार सर्वेक्षण करा आणि तुमच्या मताला दुजोरा द्या.

## सारांश :

### प्रस्तावना :

- **अर्थ व व्याख्या :**

भारतातील ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यामध्ये लघुउद्योग महत्त्वाची भूमिका पार पाडतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये उद्भवणारी बेकारीची समस्या बहुतांशी प्रमाणात लघुउद्योग सोडवितात.

थोडक्यात, लघुउद्योग हे श्रमप्रधान असतात. त्याना अल्प भांडवल लागते. ते मोठ्याप्रमाणावर रोजगार निर्माण करतात आणि देशाच्या निर्यातीमध्ये महत्त्वाचा वाटा उचलतात.

- **लघुउद्योगाचे महत्त्व :**

    १. नोकरीची संधी
    २. प्रादेशिक समतोल
    ३. स्पर्धा शक्तीत वाढ
    ४. नैसर्गिक संसाधनांचा जास्तीत जास्त वापर
    ५. स्थलांतरात घट
    ६. मोठ्या उद्योगासाठी पूरक
    ७. नव उद्योजकांचा विकास

- **लघुउद्योगाचे फायदे :**

    १. मोठ्या प्रमाणावर रोजगार
    २. अल्प भांडवलावर व्यवसाय
    ३. स्थानिक संसाधनांचा विनियोग
    ४. औद्योगिक उत्पादनात वाढ
    ५. निर्यातीमधील योगदान
    ६. न्याय्य वाटप
    ७. विदेशी चलनाची मिळकत
    ८. उद्योजकतेतील संधी
    ९. खर्चात बचत
    १०. स्थलांतर घट
    ११. कामातील लवचीकता

- **लघुउद्योगासमोरील आव्हाने :**

    १. उत्पादनाच्या जुन्या पद्धती
    २. भांडवलाची कमतरता
    ३. कच्च्या मालाची समस्या
    ४. कामगार समस्या
    ५. विपणन विषयक समस्या
    ६. वाहतूक समस्या
    ७. आजारी उद्योग
    ८. इंधनाची कमतरता व अपुरा पुरवठा
    ९. वैश्विक स्पर्धा

- **लघुउद्योगाच्या उभारणीतील टप्पे :**

    १. उद्योग किंवा व्यवसायाची निवड
    २. व्यावसायिक पर्यावरणाची पाहणी
    ३. उत्पादनाची निवड
    ४. जागेची निवड

५. तंत्रज्ञानाची निवड

६. प्रकल्प तयार करणे

७. अर्थपुरवठा

८. नोंदणी करणे

९. संसाधने व्यवस्था

अ) भौतिक संसाधने

ब) वीज व पाणीपुरवठा व्यवस्था

क) कर्मचारी भरती

१०. उत्पादन आणि विपणन

११. पाठपुरावा

## सूची

**सूची :**


१) NCERT ११वी कॉमर्स व्यावसायिक अभ्यास

२) व्यावसायिक उद्योजकता - डॉ.जयंत जोशी, पिंपळपुरे अॅन्ड कंपनी, पब्लिशर्स्

३) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ - पुणे (११ वी कॉमर्स)

४) www.sadanet/adls/microfinance

५) Business Map of India.com

६) www.mced.nic.in

७) udyojakanagazine@gmail.com

८) https//hing inleaders inprocedure-starting


**रोजगार संधी :**

१) लघुउद्योजक

२) कृषी उद्योजक

३) दुग्धव्यवसाय उद्योजक

४) छोटा अभियांत्रिकी उद्योग

५) चर्मोद्योग

६) लघुकापड व्यावसायिक

७) औषध निर्मिती उद्योग



## स्वाध्याय

**प्र.१ ला अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. भारतामध्ये .......... समस्या हा ज्वलंत प्रश्न आहे.

अ) रोजगार ब) बेकारी क) प्रदूषण

२. भारत हा...........प्रधान देश आहे.

अ) मनुष्यबळ ब) अर्थ क) सामग्री

३ ...........दराने होणारा वीज पुरवठा, वीज कपात, खंडित वीज पुरवठा यामुळे उत्पादकतेवर परिणाम होतो.

अ) जादा ब) कमी क) सरासरी

४. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी, .............. पर्यावरणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

अ) व्यावसायिक ब) नैसर्गिक क) राजकीय

५. लघुउद्योग हे .......... प्रधान असतात.

अ) अर्थ ब) शक्ती क) मनुष्यबळ

६. व्यवसाय सुरू करण्याची कल्पना उदयोजकाच्या मनात येणे ही व्यवसाय सुरू करण्याची........... पायरी आहे.

अ) प्रथम ब) द्वितीय क) तृतीय

७. देशाच्या औदयोगिक निर्यातीमध्ये लघुउद्योगाचा वाटा ............. असतो.

अ) ४०% ब) ६०% क) २०%

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) सूक्ष्म उत्पादन क्षेत्र | १) हातमाग |
| ब) पारंपारिक लघुउद्योग | २) अकुशल किंवा कुशल |
| क) नोंदणी | ३) रु.२५लाख पेक्षा जास्त नाही |
| ड) मनुष्यबळ | ४) ४०% निर्यात |
| इ) सायकल | ५) रु.१ लाख पेक्षा जास्त नाही |
| | ६) जिल्हा उद्योग केंद्र |
| | ७) विपणन समस्या |
| | ८) आधुनिक लघुउद्योग |
| | ९) प्रकल्प मूल्यांकन |
| | १०) खर्च कार्यक्षमता. |

**क) योग्य शब्द, शब्दसमूह, संज्ञा लिहा.**

१. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असणारे क्षेत्र

२. विजेचा वापर परंतु ५० पेक्षा कमी कर्मचारी असणारा उद्योग

**ड) चूक की बरोबर ते लिहा.**

१. देशाच्या अर्थव्यवस्थेचा आर्थिक समतोल राखण्यासाठी लघुउद्योगांचा विकास झाला पाहिजे.

२. बहुतांशी लघुउद्योग हे अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करतात.

३. लघुउद्योगांना अल्प व्याज दराने सहजपणे कर्ज उपलब्ध होते.

४. स्पर्धेमध्ये लघुउद्योग टिकू शकत नाही.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) काथ्या, सुटे भाग, हातमाग, उद्योग हस्तकला

२) सायकलचे सुटे भाग, रेशीमउद्योग, विद्युत उपकरणे, शिलाई यंत्र

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) ................ उद्योग हे देशाच्या विकासाला हातभार लावतात.

२) लघु उद्योग ................ क्रमांकाची सगळयात मोठी रोजगार निर्मिती करणारी संस्था आहे.

३) लघु-उद्योगांना वस्तूंच्या...........उत्पादन किमतींचा फायदा होतो.

४) लघु-उद्योग हे ............... प्रधान असतात.

५) लघु-उद्योगांना, मोठ्या उद्योगांपेक्षा ............. भांडवल लागते.

६) लघुउद्योग घरगुती उत्पादने तसेच .............. उत्पादने बनवितात.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) ₹.२५लाखापेक्षा जास्त पण ₹.५कोटींपेक्षा जास्त नाही | |
| २) | ₹.२५लाखांपेक्षा जास्त नाही. |
| ३) ₹.५ कोटींपेक्षा जास्त पण ₹.१० कोटींपेक्षा जास्त नाही | |
| ४) | ₹.१० लाखांपेक्षा जास्त नाही |
| ५) ₹.१०लाखांपेक्षा जास्त पण ₹.२ कोटींपेक्षा जास्त नाही. | |

(लघु उत्पादन क्षेत्र, सूक्ष्म उत्पादन क्षेत्र, सूक्ष्म सेवा क्षेत्र, मध्यम उत्पादन क्षेत्र, लघु सेवा क्षेत्र,)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लघुउद्योग म्हणजे काय?

२. पारंपारिक लघुउद्योगाची उदाहरणे द्या.

३. आधुनिक लघुउद्योगाची उदाहरणे द्या.

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१. भारतात **रोजगाराची** समस्या अधिक गंभीर बनली आहे.

२. भारत हा **साधन** प्रधान देश आहे.

३. लघुउद्योग **आधुनिक** तंत्रज्ञान वापरतात.

४. लघुउद्योग **अधिक** भांडवलाने सुरू केले जातात.

५. **व्यवसाय प्रकल्प** ही लघुउद्योग स्थापन करण्याची पहिली पायरी आहे.

**ज) योग्य क्रम लावा.**

अ. जागेची निवड

ब. उत्पादनाची निवड

क. व्यवसाय प्रकल्प

ड. तंत्रज्ञानाची निवड.

**प्र.२ रा संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१. लघुउद्योग

२. सेवा क्षेत्र

३. अतिलघु / सूक्ष्म व्यवसाय

४. पारंपारिक लघुउद्योग क्षेत्र

५. आधुनिक लघुउद्योग क्षेत्र

**प्र.३ रा खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

**१. श्री. राम यांना सायकलींसाठीचे भाग बनविण्याचा लघुउद्योग सुरू करावयाचा आहे.**

१. लघुउद्योग स्थापनेतली पहिली पायरी कोणती आहे?

२. श्री.राम ज्या क्षेत्रात व्यवसाय करू इच्छित आहेत ते क्षेत्र ओळखा.

३. लघुउद्योगाचा कोणताही एक फायदा सांगा.

**प्र.४ था खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. लघुउद्योगांचे कोणतेही चार महत्त्व स्पष्ट करा.

२. लघुउद्योगांचे कोणतेही चार फायदे स्पष्ट करा.

३. लघुउद्योगांसमोरील कोणतीही चार आव्हाने स्पष्ट करा.

**प्र.५ वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. सर्वसाधारणपणे लघुउद्योग हे आजारी असतात.

२. लघुउद्योगासाठी अल्प भांडवल लागते.

३. लघुउद्योगांना समस्यांना सामोरे जावे लागते.

**प्र.६ वा खालील प्रश्न सोडवा.**

१. लघुउद्योगाचा अर्थ स्पष्ट करा.

२. लघुउद्योगाचे महत्त्व विषद करा.

३. भांडवलाच्या कमतरतेचा लघुउद्योगावर होणारा परिणाम थोडक्यात स्पष्ट करा.

४. लघुउद्योगांना भेडसावणाऱ्या कोणत्याही पाच समस्या सांगा.

५. रोजगार निर्मितीमध्ये लघुउद्योगाची भूमिका स्पष्ट करा.

**प्र.७ वा खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. लघुउद्योगांसमोरील आव्हाने स्पष्ट करा.

२. लघुउद्योगांचे फायदे स्पष्ट करा.

३. लघुउद्योगांच्या स्थापनेची प्रक्रिया स्पष्ट करा.

४. लघुउद्योगांचे महत्त्व स्पष्ट करा.

५. भांडवलाचा व कच्च्या मालाचा अभाव हे लघुउद्योगांच्या अल्प आजाराचे कारण आहे हे स्पष्ट करा.